# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**


**No,CGRF/AZ/U / 184 / 2009 / 18 /** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

**Sub:- Forwarding of grievance in respect Shri Dinesh Ramdasrao Thorat ,17, Deoindrayani Housing Society, Shahnoorwadi, Aurangabad. Consumer No. 490011734933**

**Dear Sir,**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Dinesh Ramdasrao Thorat ,17, Deoindrayani Housing Society, Shahnoorwadi, Aurangabad.**

**You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with related documents**.

**The hearing in this matter is kept on 25/02/2009 at 13=45 Hrs**.

**Encl: As above**

**Member/Secretary**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

Copy to:-

**Shri Dinesh Ramdasrao Thorat ,**
**17, Deoindrayani Housing Society,**
**Shahnoorwadi,**
Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८४/२००९/१८**

**तक्रार दाखल दिनांक :- १०/०२/२००९**
**निकाल दिनांक :- ३१/०३/२००९**

**श्री दिनेश रामदासराव थोरात,**
**१७,देवइंद्रायणी हौसिंग सोसायटी,**
**शहानूरवाडी, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११७३४९३३) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर मंडळ औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १०/०२/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २५/०२/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने घरगुती वापरासाठी महावितरण वीज कंपनीकडुन वीज पुरवठा घेतला असुन त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००११७३४९३३ असा आहे. महावितरण तर्फे त्यांना सप्टेबर २००८ पर्यंत देण्यात आलेल्या वीज बिलाचा भरणा त्यांनी केलेला आहे. पण त्यानंतर फेब्रुवारी २००९ मध्ये वाढीव वीज बिल देण्यात आले. या बिलाबाबत त्यांनी महावितरणच्या छावणी उपविभागाकडे तक्रार केली असता त्याची दखल घेण्यात आली नाही. महावितरण तर्फे देण्यात आलेल्या या चुकीच्या वीज बिलापोटी त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्याबाबत धमकी येत असल्याचे सांगत त्यांनी व्याज व दंड न लावता सुधारीत वीज बिल तसेच वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक २५/०२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री थोरात उपस्थित होते छावणी उपविभागाकडुन याप्रकरणाची कागद पत्रे न मिळाल्यामुळे त्यांनी सुनावणीची तारीख पुढे वाढविण्याची विनंती मंचास केली. महावितरण तर्फे अर्जदारास चुकीचे वीज बिल आकारण्यात आल्याचे आढळुन आल्यामुळे अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत न करण्याचा अंतरिम आदेश पारीत करीत या प्रकरणाची पुढील सुनावणी ०३/०३/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक ०३/०३/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी पुन्हा याप्रकरणाची कागदपत्रे छावणी उपविभागाकडुन उपलब्ध झाली नसल्याचे सांगत सुनावणी पुढे

वाढविण्याची  केली मंचाने नोडल अधिकारी यांना ०७/०३/२००९ पर्यंत आपला जवाब मंचात दाखल करण्याचे आदेश दिला.

४) नोडल अधिकारी यांनी दिनांक ०६/०३/२००९ रोजी आपला जवाब मंचात दाखल केला व अर्जदारास चुकीचे वीज बिल देण्यात आल्याचे मान्य केले अर्जदारास पुढील वीज बिलात ३०९९९.४७ रूपये चे क्रेडीट देण्याची तयारी त्यांनी दर्शविली तसेच व्याज व दंड देखील पुढील वीज बिलात रद्द करण्यात येईल असे आपल्या जवाबात म्हटले आहे.

५) दोन्ही बाजु तर्फे मंचात दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरून व मंचासमोर झालेल्या सुनावणीवरून असे आढळुन येते की अर्जदाराची सप्टेबर २००८ पर्यत वीज बिलाबाबत कोणतीही तक्रार नव्हती ऑक्टोबर २००८ या महीन्यात त्यांना महावितरण कंपनीतर्फे मागिल रिडींग ४०३ व चालु रिडींग ५०४० अशी दाखवत ४६३७ युनिट वीज वापराचे वीज बिल आकारण्यात आले. नोव्हेबर २००८ व डिसेंबर २००८ या महीन्यात अर्जदारास सरासरीवर आधारीत ८७४ युनीट वीज वापराचे बिल आकारण्यात आले. अर्जदाराने मंचात तक्रार दाखल केल्यानंतर दिनांक ०७/०२/२००९ रोजी त्यांच्या मिटरची स्थळ पाहणी करण्यात आली ज्यात मीटरवरील रिडींग ००७९० अशी असल्याचे दिसुन येते. यावरून ऑक्टोबर २००८ मध्ये चालु रिडिंग म्हणुन दाखविण्यात आलेली ५०४० ही रिडींग चुकीची असल्याचे स्पष्ट होते. अर्जदाराने या चुकीच्या वीज बिलाबाबत केलेल्या तक्रारीची कोणतीही दखल महाविरण तर्फे घेण्यात आली नसल्याचे दिसुन येते. नोडल अधिकारी यांनी सुधारीत वीज बिल प्रस्ताव मंचात दाखल केला असुन त्यात ३०९९९.४७ रूपये क्रेडीट देण्याची तयारी दर्शविली आहे. मंचाने या सुधारीत वीज बिल प्रस्तावाची पाहणी केल्यावर तो योग्य असल्याचे दिसुन येते. अर्जदाराने मंचात दाखल केलेली दाखल केलेली तक्रार योग्य असुन महावितरण कंपनीतर्फे त्यांना चुकीचे वीज बिल आकारण्यात आल्याचे स्पष्ट होते अर्जदार हे नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास तीस दिवसात सुधारीत वीज बिल द्यावे. व त्यात व्याज व दंड आकारू नये.

२) वरील प्रमाणे सुधारीत वीज बिल देतांना अर्जदाराने भरलेल्या रक्कमेची वजावट करावी.

३) महावितरण कंपनीने अर्जदारास रूपये २५०/- नुकसान भरपाई द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८४/२००९/१८** **दिनांक :-**

**प्रति,**

**श्री दिनेश रामदासराव थोरात,**
**१७,देवइंद्रायणी हौसिंग सोसायटी,**
**शहानूरवाडी, औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१८४/२००९/१८ )

आपण दिनांक १०/०२/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८४/२००९/१८ दिनांक ;-

प्रति,
श्री दिनेश रामदासराव थोरात,
१७,देवइंद्रायणी हौसिंग सोसायटी,
शहानूरवाडी, औरंगाबाद.

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१८४/२००९/१८ )

आपण दिनांक १०/०२/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**